"मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास
व "मराठी चित्रपट सृष्टीचा समग्र इतिहास" या
प्रकल्पास मान्यता व खर्चास मंजूरी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक :रासांधो-२०११ / प्र.क्र.१०४/२०११/भाषा -३
मंत्रालय , मुंबई-४०० ०३२,
दिनांक- २ जानेवारी, २०१२

संदर्भ : १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.सासंमं-२००७/प्र.क्र.५/ सां.का.२, दि.१९.१२.२००७.
२. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मभावा २०१०/४५८/प्र.क्र.९५(भाग-२)/२०ब, दि.२२.७.२०१०.

**प्रस्तावना** :- शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. सासंमं-२००७/प्र.क्र.५/ सां.का.२, दि.१९.१२.२००७ अन्वये "मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास" हा प्रकल्प प्रा.दत्ता भगत, औरंगाबाद यांच्याकडे तर "मराठी चित्रपट सृष्टीचा समग्र इतिहास" हा प्रकल्प श्री.हेमंत देसाई, मुंबई यांच्याकडे सोपविण्यात येऊन सदर दोन्ही प्रकल्पास प्रशासकीय मान्यता व दोन्ही प्रकल्प संपादकांच्या मानधनापोटी प्रत्येकी रु.२,००,०००/- अशा एकूण रु.४,००,०००/- (रुपये चार लक्ष फक्त) इतक्या खर्चास मंजूरी देण्यात आली आहे.

**शासन निर्णय** : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मभावा २०१०/४५८/प्र.क्र.९५(भाग-२)/२०-ब, दि.२२.७.२०१० अन्वये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली असून त्यानुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई मराठी भाषा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली वर्ग करण्यात आले आहे. सबब या शासन निर्णयान्वये "मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास" व "मराठी चित्रपट सृष्टीचा समग्र इतिहास" या दोन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता व दोन्ही प्रकल्प संपादकांच्या मानधनासाठी प्रत्येकी रु. २,००,०००/- अशा एकूण रु.४,००,०००/- (रुपये चार लक्ष फक्त) इतक्या होणाऱ्या खर्चास दि.१९.१२.२००७ च्या शासन निर्णयात अंतर्भुत करण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

२. दोन्ही प्रकल्पांची मुद्रणप्रत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या ताब्यात आल्यानंतर छपाईसाठीचा योजनेत्तर खर्च त्या त्या वर्षासाठी "प्रकाशने" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३.	यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४.	सदर दोन्ही प्रकल्पांसाठी होणारा खर्च, "मागणी क्र.झेड एफ०२, २२०५ - कला व संस्कृती (००) १०२, कला व संस्कृती प्रचालन, ०१ योजनांतर्गत योजना (०१)(०१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) - ३१ सहायक अनुदाने (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या मंजूर तरतूदीतून व मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे भागविण्यात यावा. उर्वरीत मानधनावरील खर्च हा सन २०१२ - २०१३ या वित्तीय वर्षात सदर लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५.	हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-४, परिच्छेद-२७ (२) मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६३५५१३२३३)

(किशोर रा.कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२.	सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३.	महालेखापाल, महाराष्ट्र - १/२, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ); मुंबई.
४.	अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
५.	निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
६.	महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा) महाराष्ट्र , मुंबई,
७.	वित्त विभाग, (व्यय - ४ / सेवा ५ / विनियम), मंत्रालय, मुंबई,,
८.	निवड नस्ती (भाषा-३).